# जाहीर निविदा

## जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, लातूर या आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या न्यायालयासाठी **७०(GSM) (B2B Copier) झेरॉक्स पेपर 300 रिम,** व **७५(GSM) (Copy Gold) झेरॉक्स पेपर 200 रिम** खरेदी करावयाचे आहेत. तरी ज्या कोणाला योग्य दरात पूरविणे शक्य असेल, त्यांनी दरपत्रके खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून दिनांक २७/०२/२०२४ पर्यंत जिल्हा न्यायालय, लातूर येथे अधिक्षक, वित्त व लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, लातूर यांचेकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावीत.

### दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तुच्या किंमती इत्यादीबाबत स्वतंत्र नमूद कराव्यात, तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमूद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर यांचे नावे नमूद असावा. सदर लखोटयावर **"७० (B2B Copier) व ७५ (GSM)(Copy Gold) झेरॉक्स पेपर "** खरेदी बाबतचे दरपत्रक असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करण्यात येवू नये.

५. पुरविण्यात आलेले **"७० (B2B Copier) व ७५ (GSM)(Copy Gold) झेरॉक्स पेपर "** हे चांगल्या स्थितीत व चांगल्या प्रतीचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

६. निविदाकाराने सदरील वस्तु हे या कार्यालया पर्यंत पोहचविण्याचा खर्च (Delivary Charges ) अनुज्ञेय होणार नाही.

७. दरपत्रक देणा-या व्यक्तीने आपले दुकानाचे लायसन्स, पॅन कार्ड, बॅंक पासबुकची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्राकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच स्वतःचे मुळ पॅनकार्डची सत्यता या कार्यालयाकडून पडताळणे बंधनकारक राहील.

८. दरपत्रक नाकारण्याचे सर्व अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,लातूर यांना राहील.

आज दिनांक २१/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

दिनांक :- २१/०२/२०२४

(प्रबंधक)
जिल्हा न्यायालय, लातूर
जा.क्र.रोविले/ ८८६ /२०२४.
जिल्हा न्यायालय, लातूर.
दिनांक २१ / ०२/२०२४.

प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी :-

१. अधिक्षक, वित्त व लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, लातूर यांच्याकडे.
२. जिल्हा संगणक प्रणाली, प्रशासक, जिल्हा न्यायालय, लातूर यांच्याकडे.